IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** श्रीगोंदा

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0310 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**27/03/2025 03:02

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 26/03/2025
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/03/2025
**Time From (वेळेपासून):** 16:37 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/03/2025 **Time (वेळ):** 01:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 001

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/03/2025 03:02 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

आग्नेय, 0.5 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** दुय्यम निबंधक कार्यालय,श्रीगोंदा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a)Name (नाव):** वैभव दिलीप मेथा

**(b)Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बालाजीनगर, श्रीगोंदा,श्रीगोंदा,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | बालाजीनगर, श्रीगोंदा,श्रीगोंदा,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9225505090

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सचिन पांडुरंग खताळ | | | 1. धांदरफळ खुर्द,संगमनेर,संगमनेर तालुका,अहिल्यानगर,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5000/ रु रोख रक्कम | 5,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद श्रीगोंदा,जिल्हा-अहिल्यानगर

दि.27/03/2025.

मी वैभव दिलीप मेथा, वय-36 वर्षे,व्यवसाय- वकील व बिल्डर, रा. बालाजीनगर, श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर, मो. नं. 9225505090.

समक्ष फिर्याद देतो की,मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन मी दि.26/03/2025 रोजी पोलीस निरीक्षक श्री. आल्हाट, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहिल्यानगर यांना फोन करून मला एका लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी मला श्रीगोंदा येथे सुरक्षित ठिकाणी उपस्थित राहण्यास सांगितले. त्यानुसार दि. 26/03/2025 रोजी दुपारी 15/00 वाजेचे सुमारास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहिल्यानगर चे अधिकारी व कर्मचारी हे श्रीगोंदा येथे मी थांबलेल्या सुरक्षित ठिकाणी आले. सदर ठिकाणी पोनि आल्हाट यांनी माझा परिचय करुन घेतला तसेच आम्हाला त्यांचा व त्यांचे सोबतचे कर्मचारी, दोन शासकीय पंचाचा परिचय करुन दिला.

त्यानंतर मी पोनि श्री.आल्हाट यांचे सुचनेवरुन शासकीय वाहनात बसलो व दोन शासकीय पंचासमक्ष तक्रार सांगितली की," मी वकील, बिल्डर तसेच प्लॉट खरेदी विक्रीचा व्यवसाय करतो. श्रीगोंदा येथील गट नं. 1171 मधील 05 हेक्टर 68 आर क्षेत्रापैकी 28 आर जमिन श्री. संजय श्रीकांत रोंघे व इतर 2 यांचे कडुन मी व इतर 27 यांनी 5,90,000/- रुपयास दुय्यम निबंधक कार्यालय श्रीगोंदा यांचे कडील दस्त क्रमांक 1501/2025 अन्वये दि. 28/02/2025 रोजी खरेदी दस्त नोंदविलेले आहे. तसेच आज दिनांक 26/03/2025 रोजी माझे पार्टनर तसेच आशील श्री. वैभव पांडुरंग पाचपुते व इतर 19 यांनी श्रीगोंदा येथील गट नं. 1171 मधील श्री. 20 आर क्षेत्रापैकी श्री. वैभव पाचपुते यांचे अविभाज्य हिस्स्याची पुर्ण विक्रीचे 1 आर क्षेत्र श्रीमती रेखा पोपट चिखलठाणे यांना 50,000/- रुपयास विक्री केल्याबाबतचा दस्त नोंदविण्याकरीता मला दुय्यम निबंधक कार्यालयात देण्याकरीता माझेकडे दिला होता. त्यावेळी मी सदरचा दस्त दुय्यम निबंधक श्री. खताळ यांचेकडे दिला. त्यावेळी श्री. खताळ यांनी आजच्या दस्ताचे 5000/- रुपये व दि.28/02/2025 रोजी नोंदविलेल्या दस्ताचे 10,000/- दयावे लागतील असे म्हणाले. दस्त नोंदणीकरीता सरकारी फि व्यतिरीक्त पैसे देण्याची आवश्यकता नाही हे मला माहीत आहे. त्यावेळी माझे लक्षात आले की दुय्यम निबंधक श्री. खताळ यांनी माझेकडे दि.28/02/2025 रोजी नोदविलेल्या दस्ताच्या मोबदल्यात 10,000/- रुपये तसेच माझे आशील व पार्टनर श्री.पाचपुते यांनी दिलेला दस्त नोंदविण्याकरीता 5000/- रुपये असे एकुण 15,000/- रुपये मागणी केलेली रक्कम लाच आहे. मला त्यांना लाच देण्याची देण्याची ईच्छा नाही. मी आज दुय्यम निबंधक कार्यालय श्रीगोंदा येथे जावुन श्री. खताळ यांची भेट घेवुन सदर दस्ताच्या संबंधाने चर्चा करणार आहे. सदर चर्चे दरम्यान त्यांनी माझेकडे लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कायदेशीर कारवाई करावी. वगैरे मजकुरची तक्रार सांगितली. मी सांगितलेली तक्रार माझ्या स्वहस्ताक्षरात लिहुन देण्यास पोनि.आल्हाट यांनी मला सांगितले. त्यावरून मी माझ्या स्वहस्ताक्षरात सविस्तर तक्रार लिहुन दिली त्यावर मी, दोन्ही पंचांनी व पोनि आल्हाट यांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर माझ्या तक्रारीवरुन लोकसेवक खताळ यांची लाच मागणी पडताळणी करण्याचे ठरले. पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी लाच मागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत मला व पंचांना माहिती समजावून सांगितली. पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी व्हाईस रेकॉर्डरमध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालुन,व्हाईस रेकॉर्डर चालु करून,त्या मेमरीकार्ड मध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली.त्यानंतर पोनि आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये मी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करणेकामी पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट,दोन्ही पंच व मी असे उपस्थित असलेबाबत निवेदन रेकॉर्ड केले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. आल्हाट यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे

कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सूचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोनि आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांचे सुचने प्रमाणे मी पंच नं.1 यांचेसह माझी चारचाकी वाहनाने लोकसेवक खताळ यांची भेट घेण्याकरीता दुय्यम निबंधक कार्यालय, श्रीगोंदा येथे 16/37 वा. चे सुमारास रवाना झालो.

मी व पंच नं. 1 असे दुय्यम निबंधक कार्यालय,श्रीगोंदा गेल्यानंतर लोकसेवक खताळ हे बसत असलेल्या कक्षामध्ये जावुन त्यांची भेट घेतली. त्यावेळी लोकसेवक खताळ यांचे सोबत दस्ताबाबत चर्चा केल्यानंतर कसं करायच विचारल्यावर खताळ यांनी तुमच्या हिशोबानं करा तैयवशेल, असे म्हणाल्यावर मी दिनांक 28/02/2025 रोजी 28 गुंठयाचे खरेदी दस्ताबाबत विचारणा करून किती तुमचे? असे विचारले असता लोकसेवक खताळ म्हणाले, मी तुम्हाला सकाळीचं बोललेलो आहे. तुम्हाला काय करायचे तुमच्या हिशोबानं करा फक्त व्यवस्थित, असे म्हणाले असता ठिक आहे पहिले दिनांक 28/02/2025 रोजी 28 गुंठयाचे खरेदी दस्ताबाबत आणि आज झालेल्या दस्ताचे नोंदणीचे किती असे विचारले असता लोकसेवक खताळ म्हणाले कि, 28 गुंठयांचे पुणचे खरेदी दस्ताचे पैसे माझे पार्टनर कडुन घेतील आज रोजी झालेल्या अभिभक्त दस्ताचे करून घेतु, असे म्हणाले असता त्यावेळी मी त्यांना ठिक आहे, असे म्हणुन पंच नं.1 यांचेसह सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 17.04 वा.चे सुमारास परत आलो. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी माझ्या ताब्यातील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला.

त्यानंतर मी व पंच क्र.1 यांनी वरील घडला प्रकार पोनि आल्हाट यांना पंच क्र.2 यांचे समक्ष सांगितला तसेच पोनि आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डरमधील रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता लोकसेवक खताळ यांनी दिनांक 28/02/2025 रोजी झालेल्या खरेदी दस्ताकरीता माझे पार्टनर यांचेकडुन पैसे स्विकारण्याचे मान्य करून आज रोजी माझे पार्टनर व अशिल श्री. पाचपुते यांच्या नोंदविलेल्या दस्ताच्या मोबदल्यात माझेकडे "तुम्हाला सकाळीचं बोललेलो आहे, तुम्हाला काय करायचे, तुमच्या हिशोबानं करा, फक्त व्यवस्थित " असे म्हणुन माझेकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर मी पोनि आल्हाट यांना पंचासमक्ष कळविले की, लोकसेवक खताळ यांनी दि. 26/03/2025 रोजी सकाळी माझे आशील व पार्टनर श्री.पाचपुते यांचे दस्त नोंद करण्याअगोदर माझेकडे 5,000/-रुपयांची मागणी केली होती. त्याप्रमाणे लोकसेवक खताळ यांना लाच म्हणुन 5,000/-रुपये रक्कम देण्याचे सर्वानुमते ठरले.

लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी मी माझ्या बचतीतुन 5000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 10 भारतीय चलनी नोटा, अशी रक्कम हजर केली. पोलीस निरीक्षक श्री. आल्हाट यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अॅन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोना काळे यांनी करून दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावण्यात आली,एका को-या कागदावर त्या नोटाचे नंबर लिहुन घेण्यात आले व सदर लाच रक्कम लोकसेवक खताळ यांना देण्याकरीता माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन दिली. पोलीस निरीक्षक श्री.आल्हाट यांनी सापळा कारवाई बाबत मला व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर लोकसेवक खताळ यांचेविरूध्द दुय्यम निबंधक कार्यालय, श्रीगोंदा येथे लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले. पोनि श्री. आल्हाट यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हाईस रेकॉर्डर चालु करून माझ्या ताब्यात दिले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे माझ्या चारचाकी वाहनावरून 17/56 वा. रवाना झालो व पोनि आल्हाट, पंच क्र. 2 व सापळा पथक असे शासकीय वाहनाने आमचे मागोमाग आले,मी व पंच नं.1 असे दुय्यम निबंधक कार्यालय, श्रीगोंदा कार्यालयाचे बाहेर येवुन थांबलो. सापळा पथक आमचे पाठोपाठ आल्याची खात्री झाली. त्यावेळी मी व पंच नं.01 असे लोकसेवक खताळ यांचे कक्षात गेलो. आमच्या पाठोपाठ सापळा पथक देखील कार्यालयाचे जवळ येवुन थांबले. त्यानंतर मी माझे पॅन्टच्या खिशामधील 5000/- रूपये लाच रक्कम उजव्या हाताने काढुन लोकसेवक खताळ यांना देण्यासाठी त्याचेसमोर धरून हे आजच्या दस्ताचे आहेत, तुम्ही म्हणल्याप्रमाणे व्यवस्थित केलय, पाच हजार दिलेत, असे म्हणालो असता लोकसेवक खताळ यांनी पाच हजार आहेत का हे, असे म्हणुन मी त्यांचेसमोर धरलेली लाच रक्कम 5000/- रूपये त्यांचे उजवे हाताने स्वीकारून त्यांच्या समोरील टेबलच्या ड्रॉवरमध्ये ठेवली. त्यानंतर माझेत व लोकसेवक खताळ यांचेत दस्त नोंदणी बाबत थोडा वेळ चर्चा झाली. त्यानंतर मी त्यांचे कक्षाचे बाहेर येवुन सापळा पथकास लोकसेवक खताळ यांनी लाच स्वीकारल्याचा नियोजत इशारा केला. ती वेळ 18/09 वा. दरम्यानची होती. त्यावेळी पोलीस निरीक्षक श्री. आल्हाट, पंच क्र.2 व सापळा पथक तेथे आले व लोकसेवक खताळ यांना लाच रकमेसह रंगेहाथ पकडले. व पंच नं.02 करवी लोकसेवक खताळ यांनी स्विकारलेली लाच रक्कम हस्तगत केली.

त्यावेळी पोनि आल्हाट यांनी लोकसेवक खताळ यांना त्यांचे नाव,गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव सचिन पांडुरंग खताळ, वय 38 वर्षे, दुय्यम निबंधक श्रेणी-1, वर्ग-3, दुय्यम निबंधक कार्यालय, श्रीगोंदा, सध्या रा. श्री. काळोखे यांचे फ्लॅट मध्ये भाडयाने,फ्लॅट क्र. 101, साईराज अपार्टमेंट, श्रीगोंदा, जि.अहिल्यानगर, मुळ रा.

धांदरफळ खुर्द, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर असे सांगीतले. त्यावेळी पोनि आल्हाट यांनी मला बाहेर थांबण्याचे सांगुन लोकसेवक खताळ यांच्या आवश्यक त्या तपासण्या केल्या. त्यानंतर मला पोनि आल्हाट यांनी शासकीय विश्रामगृह, श्रीगोंदा येथे येण्यास सांगीतले व पोनि आल्हाट व त्यांचे सापळा पथक पुढील कामकाज करणेकामी लोकसेवक खताळ यांना घेवुन शासकीय विश्रामगृह, श्रीगोंदा येथे आले व मला दिलेल्या सुचनाप्रमाणे मी माझ्या वाहनाने विश्रामगृह येथे आलो. त्याठिकाणी सापळा पथकाने त्यांचे पुढील कामकाज केले.

तरी दि. 26/03/2025 रोजी 16/37 वा. ते 17/04 वा.च्या दरम्यान लाचमागणी पडताळणी वेळी यातील लोकसेवक खताळ, दुय्यम निबंधक, श्रीगोंदा यांनी दुय्यम निबंधक कार्यालय, श्रीगोंदा येथे माझेकडे माझे पार्टनर व अशिल श्री. पाचपुते यांच्या नोंदविलेल्या दस्ताच्या मोबदल्यात मी तुम्हाला सकाळीचं बोललेलो आहे, तुम्हाला काय करायचे तुमच्या हिशोबानं करा, फक्त व्यवस्थित असे म्हणुन माझेकडे दि. 26/03/2025 रोजी सकाळी मागणी केल्याप्रमाणे 5,000/-रुपये लाचेची मागणी करून ती रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. तसेच सापळा कारवाई वेळी 17/56 ते 18/09 वा. दरम्यान लोकसेवक खताळ यांनी सदरची लाच रक्कम माझेकडुन दुय्यम निबंधक कार्यालय, श्रीगोंदा येथील त्यांचे कक्षामध्ये पंचासमक्ष स्विकारली म्हणुन लोकसेवक सचिन पांडुरंग खताळ, वय 38 वर्षे, दुय्यम निबंधक श्रेणी-1, वर्ग-3, दुय्यम निबंधक कार्यालय, श्रीगोंदा, सध्या रा. श्री. काळोखे यांचे फ्लॅट मध्ये भाड्याने फ्लॅट क्र. 101, साईराज अपार्टमेंट श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर, मुळ रा. धांदरफळ खुर्द,ता.संगमनेर, जि. अहिल्यानगर यांचे विरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष हे लिहून दिले.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

KIRAN BAJIRAO SHINDE(I (Inspector)) / 14901000362KBSM8001X **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15 **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
भोईवाडा पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** KIRAN BAJIRAO SHIN

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** 14901000362KBSM800